# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 14.09.2026** **वार : सोमवार**

---

1. 18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेचा नवी दिल्लीत समारोप
2. ब्रिक्सची विविधता हीच या गटाची ओळख आणि सहकार्य हीच प्रेरणा असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. हिंदी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन; केंद्रीय गृहमंत्री अमित शहा नवी मुंबईत अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं उद्घाटन करणार
4. गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाला आजपासून प्रारंभ आणि
5. टी-20 आशियाचषकावर महिला क्रिकेट संघाची मोहोर

**पंतप्रधान**

ब्रिक्स हा केवळ राष्ट्रांचा समूह नसून तो समस्यांवर तोडगा काढण्यासाठीचा मंच आहे. भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी कालबद्ध कृती महत्त्वाची असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत सांगितलं. 18 व्या ब्रिक्स शिखर परिषदेचा समारोप झाला. यावेळी ते बोलत होते. ब्रिक्सची विविधता हीच या गटाची ओळख आणि सहकार्य हीच प्रेरणा असायला हवी; तसेच या गटाची प्रगती मानवतेच्या हितासाठी योगदान देणारी असावी. अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. गेल्या दोन दिवसांतील चर्चांमुळे आपली ही धारणा अधिक दृढ झाली असल्याचं त्यांनी सांगितले. ते म्हणाले.....

**भारत ने ब्रिक्स के मंच से मित्रता, सहभागिता और सहयोग को आगे बढ़ाया है। हमारा प्रयास रहा है कि ब्रिक्स Co-Operation केवल सरकारों तक सीमित न रहे। हमारे Entrepreneurs, Farmers, Researchers, Women, Youth और सामान्य नागरिक भी इसके सक्रिय भागीदार बनें। हमने BRICS CONNECT के माध्यम से Skills,Employability, Women in Workforce, Social Security और Capacity Building को बढ़ावा दिया है।**

शिखर परिषदेत स्वीकारलेला 'नवी दिल्ली जाहीरनामा' सर्वसमावेशक दृष्टीकोन आणि भविष्यातील सहकार्यासाठी स्पष्ट दिशा देईल, अशी आशा पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली. ब्रिक्समधील सहकार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पाहोचायला हवा. असंही ते म्हणाले. या परिषदेत जागतिक प्रशासन सुधारणा, आंतरराष्ट्रीय व्यापार, दहशतवाद, शांतता आणि सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल, आरोग्यसेवा आणि शाश्वत विकास यासह प्रमुख जागतिक आणि प्रादेशिक मुद्द्यांवर विचारमंथन झाले. ब्रिक्स नेत्यांनी दहशतवादाच्या सर्व प्रकारांचा आणि स्वरूपांचा तीव्र निषेध केला आणि दहशतवादाप्रती शून्यअसं नवी दिल्ली घोषणापत्रात नमूद करण्यात आलं आहे.

'ब्रिक्स' शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक उच्च-स्तरीय द्विपक्षीय बैठका घेतल्या. गेल्या तीन दिवसांत, विविध देशांचे राष्ट्रप्रमुखांबरोबर 15 अधिकृत बैठका झाल्या. याव्यतिरिक्त, पंतप्रधान आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रमुखांशी अनेक अनौपचारिक चर्चाही केल्या. काल त्यांनी कझाकस्तान, इजिप्त, इंडोनेशिया, फिलीपिन्स, दक्षिण आफ्रिका, बुरुंडी, नायजेरिया आणि युगांडा या देशांच्या नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली.

**अमित शहा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 25 वर्षांच्या कारकिर्दीच्या सन्मानासाठी एनडीएमधील घटक पक्ष आणि विविध स्वयंसेवी संस्था 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर या कालावधीत देशभरात 'सेवा संकल्प अभियान' राबवतील. असं केंद्रिय गृहमंत्री अमित

शहा यांनी काल मुंबईत सांगितलं, 'जन-भागीदारी'च्या माध्यमातून 'विकसित भारताच्या संकल्पनेला हातभार लावणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचं ते म्हणाले. प्रयोगशाळेत तयार होणाऱ्या हिऱ्यांची संपूर्ण परिसंस्था आणि उत्पादन साखळी पूर्णपणे भारताच्याच हातात राहील याची खात्री करावी. असं आवाहन शाह यांनी भारतीय रत्न आणि आभूषण उद्योजकांना काल केलं. मुंबईत आयोजित 52 व्या 'इंडिया जेम्स अँड ज्वेलरी अवॉर्ड्स' सोहळ्याला संबोधित करताना ते बोलत होते. त्यांनी काल 'एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई' इथं 'श्री गणेश ज्ञानआरती' या हस्तलिखितांच्या विशेष प्रदर्शनाचं उद्घाटन केलं.

**अमित शहा**

भाजपाशासित किंवा मित्रपक्षांची सत्ता असलेल्या 21 राज्यांमध्ये 2029 पूर्वी समान नागरी कायदा लागू होईल. असं अमित शाह यांनी काल मुंबईत पत्रकारांशी बोलताना सांगितलं. यापुर्वी अनेक राज्यांमध्ये UCC लागू करण्यात आला आहे. केंद्र सरकारने 'भारतीय न्याय संहिते'द्वारे देशाची फौजदारी न्याय व्यवस्था बळकट केली असून अनेक राज्यांमध्ये एका वर्षात गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण 30 टक्क्यांनी वाढलं आहे. तीन वर्षांच्या आत न्याय मिळवून देणे सुनिश्चित करण्यासाठी एक यंत्रणा उभारली जात असल्याचंही शहा यावेळी बोलताना म्हणाले.

**हिंदी दिवस**

'हिंदी दिवस' आज देशभरात साजरा केला जात आहे. 1949 मध्ये याच दिवशी संविधान सभेने देवनागरी लिपीतील हिंदी भाषेला देशाची अधिकृत भाषा म्हणून स्वीकारलं होतं. आज हिंदी ही जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी एक असून 52 कोटींहून अधिक लोकांची ती मातृभाषा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज नवी मुंबई इथं आयोजित 'हिंदी दिवस 2026' कार्यक्रम आणि सहाव्या 'अखिल भारतीय राजभाषा संमेलना'ला उपस्थित राहणार आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात विविध क्षेत्रांतील अभ्यासक, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, खासदार, वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि मान्यवर उपस्थित राहतील. अमित शाह 2025-26 या वर्षासाठीचे 'राजभाषा गौरव' आणि 'राजभाषा कीर्ती' पुरस्कार प्रदान करतील. राजभाषा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या संस्था आणि व्यक्तींचा या पुरस्कारांद्वारे सन्मान केला जाईल.

**गणेशोत्सव-शुभेच्छा**

गणेशोत्सवानिमित्त आज देशभर सार्वजनिक ठिकाणी तसंच घरोघरी उत्साहाचं आणि चैतन्याचं वातावरण आहे. गणेश चतुर्थीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान गणेश हे ज्ञान, समृद्धी आणि शुभ कार्यांच्या प्रारंभाचे प्रतीक आहेत. गणेश चतुर्थीचा उत्सव आपल्या जीवनात ऊर्जा, ज्ञान आणि सकारात्मकता घेऊन येतो. हा पवित्र सण प्रत्येकाला जीवनात नवीन संकल्प करून प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करण्याची प्रेरणा देतो, श्रीगणेश सर्वांच्या जीवनात सुख, शांती, उत्तम आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवोत, अशी प्रार्थना राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात केली आहे.

**गणेशोत्सव**

आजपासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवासाठी मुंबई पुण्यासह महाराष्ट्रात सर्वत्र जय्यत तयारी झाली आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी 1893 मध्ये या उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. तेव्हापासून पुण्याचा गणेशोत्सव हा सामाजिक एकता आणि जन-जागृतीचे प्रतीक बनला आहे. कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा हे पाच प्रमुख गणपती या उत्सवाचे मुख्य आकर्षण आहेत. गर्दीचे नियोजन, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता आणि सुरक्षा यांसाठी पुणे महानगरपालिका आणि पोलिस प्रशासन सज्ज झालं आहे.

**तीज**

'हरतालिका तीज'च्या निमित्ताने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आज देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. माता गौरी आणि भगवान शंकराच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सौभाग्य, सुख, शांती आणि समृद्धी येवो, आणि ही पृथ्वी सदैव हिरवीगार, आरोग्यसंपन्न आणि समृद्ध राहो, अशी कामनाही त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत केली आहे.

**ओमान**

ओमानच्या किनारपट्टीजवळ काल 'एमटी एल गैया' या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्याचा भारताने निषेध केला आहे. आतापर्यंत 13 भारतीय कर्मचाऱ्यांची सुटका करण्यात आली आहे, तर बेपत्ता असलेल्या एका भारतीय नागरिकाचा शोध अद्याप सुरू आहे. अशी माहिती ओमानमधील भारतीय दूतावासाने निवेदनाद्वारे दिली आहे. व्यापारी जहाजं, खलाशी, नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधांना लक्ष्य करणे अस्वीकार्य असल्याचे भारतानं म्हटलं आहे. या आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरून व्यापारी जहाजांची मुक्त आणि सुरक्षित वाहतूक पूर्ववत करण्याचे आवाहनही दूतावासानं केलं आहे.

**इराण-आखाती देश**

हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाजवाहतुकीच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यासाठी इराण आणि आखाती देशांमध्ये आज होणारी बैठक पुढे ढकलण्यात आली आहे. ओमानचे परराष्ट्र मंत्री बद्र बिन हमद अल बुसैदी यांनी काल ही माहिती दिली. काही आखाती देशांच्या विनंतीवरून हा निर्णय इराण आणि ओमान यांनी संयुक्तपणे घेतला असल्याचं वृत्त इराणच्या सरकारी माध्यमांनी दिलं आहे.

**सरनाईक**

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील सर्वसामान्य प्रवाशांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या एसटी अर्थात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच पाच हजार बसेस दाखल केल्या जाणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तसंच एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी काल दिली. एसटीची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी बस खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

**क्रिकेट**

महिलांच्या टी-20 आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतानं श्रीलंकेचा 72 धावांनी पराभव करत आठव्यांदा आशिया चषक पटकावण्याचा विक्रम केला. दुबईत काल झालेल्या सामन्यात भारतानं प्रथम फलंदाजी करत 183 धावा केल्या. शेफाली वर्मा आणि स्मृती मानधना यांनी 129 धावांची विक्रमी सलामी भागीदारी केली. प्रत्युत्तरात श्रीलंकेचा संघ 19 षटकं आणि 4 चेंडूंत 111 धावांवर बाद झाला. श्री चरणीनं 4, तर दीप्ती शर्मानं 3 गडी बाद केले. शेफाली वर्माला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी T 20 विजेत्या संघाचं अभिनंदन केलं आहे. महिला संघानं देशासाठी अभिमानास्पद कामगिरी केल्याचं मुर्मू यांनी आपल्या समाजमाध्यमावरील शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. पुरुषांच्या क्रिकेटमध्ये, काल रात्री दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या पहिल्या टी-20 सामन्यात भारतानं अफगाणिस्तानचा 7 गडी राखून पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे.

**हवामान**

गुजरातमध्ये आज अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. तसंच, हरियाणा, चंदीगड, पंजाब, पूर्व राजस्थान आणि मध्य महाराष्ट्रातही आज मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**